# नेतृत्व एक संकल्पना व आ. बच्चू कडू यांचे नेतृत्व

प्रा.डॉ.प्रशांत दि. सातपुते [1]

[1] राज्यशास्त्र विभागप्रमुख, गो.सी.टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविघालय, चांदुरबाजार जि. अमरावती.

## ABSTRACT

**Keywords:**

प्रस्तुत शोध निबंघाचा विषय"अमरावती जिल्ह्यातील अचलपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बच्चूकडू यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचे विश्लेषणात्मक अध्यन" हा आहे. बच्चू कडू यांच्या नेतृत्वाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने नेतृत्व या संकल्पनेचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. नेतृत्व हे कोणत्याही क्षेत्रातील असो, ते महत्वपूर्ण असते. राजकीय क्षेत्रात तर नेतृत्वाचा महत्त्वपूर्ण प्रभाव असतो. नेतृत्व म्हणजे काय? नेतृत्वाचा विकास कोणत्या गोष्टीवर अवलंबून असतो? असे अनेक प्रश्न समजून घेण्याच्या दृष्टीने संपूर्ण नेतृत्वाची संकल्पना समजून घेणे महत्वाचे आहे.नेतृत्वाची प्रक्रिया ही जरी दिसत नसली तरी ती समाजात अस्तित्वात असते. कोणत्याही गोष्टीला पूर्णत्वाला नेण्यासाठी नेतृत्वाची आवश्यकता असते व हे नेतृत्व जर सक्षम असेल तरच समाजाचा विकास होतो अन्यथा समाज लयास जाण्याची भिती असते.

समाजात विभिन्न क्षेत्रात अविस्मरणीय कामगितरी केलेल्या अनेक व्यक्ती असतात. त्या लोक आदरास पात्र ठरलेल्या असतात. विविध क्षेत्रात उदा. धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात अविस्मरणीय कामगिरी केलेल्या व्यक्ती समाजमनावर कायमचा प्रभाव करुन जातात व अशा व्यक्तीच्या वर्तनासाठी सामाजिकशास्त्रात नेतृत्व शब्दाचा वापर केला जातो. आजच्या आधुनिक युगात सर्वच देशात व सर्वच क्षेत्रात नेतृत्वाची संकल्पना विकसित झाली आहे. प्रत्येक प्रभावी व्यक्तिमत्व व त्यांना मानणारे दुय्यम व्यक्तिमत्व यांच्या परस्पर संबंधावर विविध संश्था विकसित होताना दिसतात. बच्चू कडू ही त्याला अपवाद नाहीत. नेतृत्व व प्रहार संघटना यांच्या परस्पर संबंधावर त्यांचे नेतृत्व विकसित होत गेले. असेच एक खंबीर नेतृत्व अचलपूर मतदारसंघाला बच्चू कडू यांच्या रुपाने लाभलेले दिसते. त्यांनी राजकीयच नाही तर सामाजिक  कार्यात देखील महत्वाची कामगिरी केलेले आहे. त्यांच्या कार्याच्या बाबतीत ते केवळ स्वतःच्या मतदारसंघालाच नाही तर पूर्ण महाराष्ट्राला परिचित आहेत.

**नेतृत्वाची संकल्पना**

'नेतृत्व' हा शब्द सर्वसाधारणपणे सर्वांनाच परिचित आहे. समाजामध्ये जो पुढारीपण करतो ते नेतृत्व या अर्थाने पाहिजे जाते. उदा. स्वातंत्र्य आदोलनात लोकमान्य टिळकांचे नेतृत्व, महात्मा गांधीचे नेतृत्व,

पंडित नेहरुंचे नेतृत्व, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नेतृत्व, श्रीमती इंदिरा गांधी, श्री. शरद पवार, स्व. बाळासाहेब ठाकरे इ. प्रभावी नेतृत्वाची उदाहरणे आहेत.

वेगवेगळ्या क्षेत्रात आणि वेगवेगळ्या काळात जे नेतृत्व उदयास येते ते सारख्याच स्वरुपाचे नसले तरी त्यामधून आढळून येणारी काही गुणवैशिष्टे ही काही प्रमाणात मिळती-जुळती असतातच आणि याच आधारावर नेतृत्वाची संकल्पना मांडलीज जाते. म्हणूनच विविध जाती, जमाती व क्षेत्र यासोबतच त्या ठिकाणी उदयाला आलेल्या नेतृत्वाला महत्व दिले जाते. नेतृत्वाचा सामाजिक चळवळीमध्ये सहभाग, राजकीय संघर्ष, हिंसा, अहिंसात्मक घटना, महत्वाच्या प्रश्नावर भूमिका या येणाव्या पिढीसाठी उपयुक्त व प्रेरणादायी ठरत असतात. नेतृत्वाच्या अभ्यासामुळे राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानवशास्त्र यातील गुप्तता उघडकीस आणता येते. नेत्यांच्या यशअपयशाची कारणमीमांसा करता येते.

जॉजॅ एच सेबाईन ने “**History of Western Political Thought**” मध्ये नेतृत्वावर हिटलरच्या "माईन काम्फ" च्या आधारावर विधान केले की, "कलाकार ज्या प्रमाणे मातीला वळण देतो, तसेच पुढारी लोकांना वळण देतात" ही सेबाईनची परिभाषा उदारवादी लोकशाही स्वरुपाची आहे. या संकल्पनेचा अभ्यास व विश्लेषण द्वितीय महायुद्धानंतरच्या काळात खर्यादअथॉने होत आहे व या संदभॉत सेलिगमग म्हणतो, "नेतृत्वाद्वारे राजकारण हे विसाव्या शतकांचे ठळक वैशिष्ट्य आहे. या ठिकाणी लोकांचा अथॅ अनुयायासहीत जनता होतो. त्यामुळे कोणत्याही नेत्याचा अभ्यास हा केवळ त्याच्या जीवनशैली पुरताच मयॉदित न राहता त्यांच्या अनुयायाशी सुद्धा संबंधित असतो. यामुळे नेतृत्वाच्या अभ्यासात, नेत्याचा अभ्यास, नेता व अनुयायी यांचे परस्पर संबंध, नेत्याची नेतृत्वाची पद्धत व त्यांचा अनुयायावर होणारा परिणाम याचाही अंतभॉव होत असतो."[१]

**नेतृत्वाच्या व्याख्या**

वेबस्टरने एक व्यक्ती समजून नेतृत्वाची व्याख्या केली आहे. त्यांच्या मते,"नेतृत्व म्हणजे अशी की जी समुहाला निदैश देते, आज्ञांकित करते अथवा प्रमुख म्हणून मागॅदशॅन करते."[२]

मॅक्सवेबरच्या मते, "नेतृत्व म्हणजे अशी पद्धती की जिच्यामध्ये नेता विशिष्ट सदभॉत आपल्या शैलीद्वारा प्रभाव तथा शक्तीचा उपयोग करतात."[३]

जेम्स मॅक ग्रोगर बन्सॅने शक्तीच्या सदभॉत नेतृत्वाची व्याख्या केली. त्यांच्या मते, "शकती व राजकारण जणू एकाच नाणयाच्या दोन बाजू आहेत आणि नेतृत्व व्यापक शक्ती प्रक्रियेचा एक भाग आहे."[४]

चालॅस मेरियमने गुणाच्या आधारावर नेतृत्वाची केली आहे. त्यांच्या मते, "नेतृत्व हे विशिष्ट प्रकारचे गुण असून ते एखाधा व्यक्तिमत्वात दृष्टिगोचर होतात व हे गुण विशिष्ट समूहाच्या सदभॉत साकार होतात."[५]

रिचडॅ सी. स्नीडर व पेग हयांनी "निर्णॅय घेण्याच्या प्रक्रियेला नेतृत्व म्हटले आहे. अथॉत राजकीय नेतृत्वामध्ये योग्यता, संसूचन आणि उद्देश ह्या तीन घटकांना महत्व असून त्यांच्या परस्परावरील

क्रियाप्रतिक्रियेतून नेतृत्व साकार होते असे म्हणतात."६

**निष्कर्ष-**

वरील नेतृत्वाच्या व्याख्यांच्या अनुरोधाने प्रस्तुत विषय हाताळीत असताना खालील बाबी स्पष्ट होतात. बच्चू कडू यांनी आपल्या कार्याच्या आधारे राजकारणात आपली पकड निर्माण केली. सर्वसामान्य लोकांच्या समस्यांची जाणीव त्यांना फार पूर्वीपासून होती. गरीब, अंध, अपंग, रोगी, शेतकरी अशा सर्वसामान्याशी निगडित प्रश्नाची उकल करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यासाठी त्यांना आंदोलनाचे हत्यार वापरावे लागले. आंदोलन करीत असताना सुद्धा सर्वसामान्य नागरिकांना पटेल च रुचेल अशा पद्धतीने आंदोलन करुन जनतेच्या समस्यांना हाक दिली.

बच्चू कडू यांनी लोकशाही शासनाला साजेसा उपक्रम अचलपूर मतदारसंघात राबविला. सामान्य जनतेला होत असलेल्या प्रशासकीय त्रास कमी व्हावा. त्यांच्या विविध समस्यासाठी होणारी भटकंती थांबावी यासाठी त्यांनी शासन आपल्या दारी, आमदार आपल्या दारी, राहूटी आपल्या दारी, शासकीय यात्रा, यात्रेत यात्रा शासकीय यात्रा अशा प्रकारच्या योजना राबविल्या आहेत व त्याची फलश्रुती सुद्धा जनतेला मिळाली. या योजनामधून जनतेचा विजेचा प्रश्न, सातबारा, जातीचे दाखले, उत्पन्नाचे दाखले, कृषी पंप, शासनाच्या विविध योजनेची माहिती अशा प्रकारचे प्रश्न यामधून सोडविले आहेत. बच्चू कडू यांचे नेतृत्व आणखी एका कारणानी वेगळे दिसते ते म्हणजे हिंसा व अहिंसा या दोन्ही मार्गांच अवलंब ते आपल्या कार्याच्या यशस्वीतेसाठी उपयोग करताना दिसतात. कुठलाही स्वार्थ न बधता सर्व सामान्याच्या मदतीला धावणारे असे हे नेतृत्व आहे. त्यामुळे कोणत्याही जातीपातीचा विचार न करता कार्यकर्ता त्यांच्या बाजूने उभा असलेला दिसून येतो.

नेतृत्व निर्धारणात परिस्थिती अधिक प्रभावी असते. नेतृत्वासंबंधीच्या वरील सर्व व्याख्यांचा विचार करीत असताना लॉर्ड वॉईड यांनी नेतृत्वाला, "पुढाकार घेण्याची कला" मानलेले आहे. चार्लस मेरीयमने सुद्धा नेतृत्वाच्या गुणाला महत्व दिले आहे. याचा अर्थ असा की, नेतृत्वामध्ये विशिष्ट प्रकारचे गुण किंवा विशिष्ट प्रकारची कला असणे आवश्यक आहे. अमरावती जिल्ह्यामध्ये बच्चू कडू यांचे निर्माण झालेले नेतृत्व विशिष्ट गुणांनी परिपूर्ण आहे काय? याचा अभ्यास नेतृत्वाच्या दृष्टीने महत्वाचा आहे. बच्चू कडू यांना राजकारणाची ही परिपूर्णरित्या अवगत आहे. परिस्थितीला अनुसरुन करायचे हे त्यांना चांगल्या पद्धतीने माहिती असल्याचे दिसून येते.

ए.स.के. जैन यांनी केलेली व्याख्या बच्चू कडू यांच्या संदर्भात पूर्णत्वाने लागू होते कारण त्यांनी प्रहार संघटनेच्या माध्यमातून कार्यकर्त्यांची फळी निर्माण केली व विशिष्ट सामाजिक उद्दिष्ट्ये प्राप्त करण्यासाठी कार्यकर्त्यांना बळ देण्याचे काम केले. तसेच या माध्यमातून त्यांनी आरोग्यसेवा, अंपग महायज्ञ, रुग्णप्रवास, रक्तदान चळवळ इत्यादी उद्दिष्ट्ये साध्य केल्याचे स्पष्ट होते. शासकीय नोकरवर्गास गावोगावी जावून शासकीय यात्रेच्या माध्यमातून जनतेची कामे करण्यास भाग पाडले. त्यांनी शासकीय कर्मचाऱ्यांना या

कृतीसाठी प्रभावित केल्याचे दिसून येते. सामान्य कार्यकर्त्यांना सुद्धा त्यांनी आपल्या कर्तव्याची जाणीव निर्माण करुन दिली आहे. ही जाणीव निर्माण करुन देत असताना त्यांनी जनसेवा या घटकाला प्राधान्य दिले आहे.

थोडक्यात नेतृत्व निर्माण होण्यासाठी तीन महत्वाचे घटाक आवश्यक आहेत. नेता, अनुयायी आणि परिस्थिती तेव्हाच खऱ्या अर्थाने नेतृत्वाची संकल्पना पूर्ण होऊ शकते. नेतृत्वाच्या निर्मितीसाठी नेत्याजवळ विश्वासू कार्यकर्त्यांचा गट असणे गरजेचे आहे. कार्यकर्त्यांच्या आधारावर कोणताही नेता मोठा होत असतो. या सर्व गोष्टी बच्चू कडू यांच्या संदर्भात दिसून येतात. नेता म्हणून तर ते पूर्णपणे सक्षम आहे. अनुयायी शिवाजी महाराजाच्या मावळ्याप्रमाणे त्यांनी निर्माण केले आहे व परिस्थिती सुद्धा त्यांना अनुकूल आहे. कारण अचलपूर मतदारसंघात सध्यातरी त्यांच्या नेतृत्वाला विरोध करणारा सक्षम नेता नाही. कार्य करण्याची क्षमता व तत्परता या गोष्टी त्यांच्यामध्ये सातत्याने दिसत आहे. व्यक्ती कितीही हुशार असेल, विद्वान असेल परंतु त्यांच्या जवळ अनुयायी (कार्यकर्ते) नसतील तर नेतृत्व उदयाला येऊ शकत नाही.

तसेच परिस्थिती ही देखील नेतृत्वाच्या उदयाला महत्वाची ठरते. जर एखदी नैसर्गिक आपती किंवा घटना घडली तर अशा परिस्थितीमध्ये ज्या व्यक्तीने सहकार्य केले, त्याला जनता पाठिंबा देते. याचा अनुभव स्थानिक स्तरापासून तर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत आढळून येतो. त्यामुळे परिस्थिती हा घटक महत्वाचा आहे. नेता, अनुयायी व परिस्थिती या तीन परस्पर संबंधातून नेतृत्व उदयाला येत असते. बच्चू कडू हे आता या तीनही घटकांनी परिपूर्ण असल्यामुळे ते आता सर्वसामान्याच्या मनात बसलेले दिसून येतात व जनसामान्याच्या अपेक्षा व फलश्रुती बच्चू कडू यांच्या रुपाने पूर्ण होतांना दिसते.

**REFERENCES**


*1. Biswas R.K. : "Leadership Development", Akhand Publshing House, New Delhi, 2010.*

*2. Kumar Akshay : "Motivation and leadership", Common wealth publisher, New Delhi, 1997.*

*३) बसू मिमेद्रनाथ : द रोल ऑफ लिडरशिप इन लाइफ ऑफ अॅन इंडिव्हीज्युएल, संपादक विधार्थी एल.पी., लिडरशिप इन इंडिया, मुंबई, १९६७.*

*४) कोरपे कुसुमताई (डॉ.) : "विदर्भातील नेतृत्वाची वाटचाल", कोरपे वा. रा., अकोला. १९७८.*

*५) नागपाल हॅन्स : लिडरशिप अ फेम ऑफ रेफरन्स, संपादक एल.पी. विधार्थी, मुंबई, १९६७.*

*1. Laster, G. Seligman, The Study of Political Leadership micropolitices, Ed. By John N. Kessel, George F. Cole Robert G. Sedding, Published by Holt, Rine hart Winston inc., New York, 1990, p.no. 51.*

*2. Websters New Twentieth Century Dictionary of the English Language (Cleaveland and NewYork : The World Publishing Company, 1960), p. 1030.*

*3. Max Weber, The Theory of Social and Economic Organization, Talcott Parsons Ed. (New York : Free Press, 1947), p. 324.*

*4. James Mack Gregor Burns, Leadership (New Delhi : Ambika Publication, 1978), p. 18.*

*5. John Kessel/cole/seding, A Plea for the Study of Political Leadership : Micropolitics (Inc., New York) p. 26.*

*6. Page Glehn D., The Scientific Study of Political Leadership, New York. : The Free Press, 1977, p. 20.*